**सध्याच्या युगात गुणात्मक शिक्षण हेच रयतचे ध्येय- मा. चंद्रकांत दळवी**

श्रीरामपूर:(प्रतिनिधी)- पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उपेक्षित, वंचित, दीनदलित व बहुजन समाजाला शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव होता. त्यामुळे कर्मवीरांनी जातीपातीची बंधने तोडून सर्वसामान्य वर्गाला त्यांच्या हक्काचे शिक्षण मिळवून दिले. त्यासाठी त्यांना प्रचंड त्याग व संघर्ष करावा लागला. या त्याग व संघर्षातूनच आज रयतचा संख्यात्मक विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे. या संख्यात्मक वाढीबरोबरच सध्याच्या युगात गुणात्मक शिक्षण देणे हे रयतचे ध्येय प्रमुख आहे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन व माजी सेवानिवृत्त आय.ए.एस. अधिकारी मा.चंद्रकांत दळवी यांनी केले.

येथील रयत शैक्षणिक संकुलातील रावबहादुर नारायणराव बोरावके महाविद्यालय, सी. डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, स्व.सौ.एस.के.सोमय्या प्राथमिक विद्यामंदिर व डी.डी. काचोळे हायस्कूल, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३६ व्या जयंती समारंभाच्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, सध्याच्या युगात जागतिक पातळीवर तंत्रज्ञान प्रचंड वेगाने बदलत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरचे शालेय जीवनापासूनच नियोजन करायला हवे. त्यासाठी गुणवत्ता पूर्ण शिक्षण, उत्तम संवाद कौशल्ये, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, तंत्रकुशलता व तात्काळ प्रतिसाद देण्याची क्षमता ही सर्व कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा रयत शिक्षण संकुल श्रीरामपूरच्या चेअरमन मा.मीनाताई जगधने यांनी भूषविले होते. याप्रसंगी व्यासपीठावर ज्येष्ठ शास्त्रज्ञ मा.भरत काळे, मा. प्रकाश निकम पाटील, राजीव शिंदे, डॉ. रवींद्र जगधने, तुकाराम कन्हेरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात मा.मीनाताई जगधने म्हणाल्या की, अण्णांसारखी तत्त्वनिष्ठ, एकनिष्ठ, सत्यनिष्ठ व बंडखोर व्यक्तिमत्वे शतकातून एकदाच जन्माला येतात. आपल्या विचार व कार्यातून समाजाला दिशा देण्याचे कार्य करतात. त्यामुळे आज बहुजन समाजाच्या झोपडीपर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचली आहे. याचे सर्वस्वी श्रेय कर्मवीर अण्णांना जाते. त्यामुळे रयत ही शिक्षण संस्था माणूस घडविणारी प्रयोगशाळा म्हणून नावारूपास येत आहे. ही आपणा सर्वांसाठी गौरवशाली व अभिमानाची बाब आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ.प्रवीण बडधे यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी करून दिला. मान्यवरांच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय व राज्य पातळीवर विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवलेल्या यशवंत, गुणवंत विद्यार्थी, प्राचार्य, प्राध्यापक यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. प्रा. सौ. मनीषा निफाडे व प्रा. डॉ. योगिता रांधवणे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक सुनील साळवे, श्रीमती सोनाली पैठणे, आजी-माजी विद्यार्थी, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, शिक्षक , शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फोटो कॅप्शन : रयत शैक्षणिक संकुलातील पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३६ व्या जयंती प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुणे मा. चंद्रकांत दळवी, अध्यक्षा मा. मीनाताई जगधने व ज्येष्ठ शास्त्रज्ञ मा.भरत काळे, मा. प्रकाश निकम पाटील, राजीव शिंदे, डॉ. रवींद्र जगधने, तुकाराम कन्हेरकर , प्राचार्य डॉ.प्रवीण बडधे, प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे, प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर व इतर मान्यवर









रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन आदरणीय चंद्रकांत दळवी IAS (Retd.) साहेब यांनी रयत प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र श्रीरामपूर या विद्यालयास सदिच्छा भेट दिली.यावेळी विद्यालयाच्या नाविन्यपूर्ण ग्रंथालयाची रचना, प्रेझेंटेशन कॉर्नर व मुक्तवाचन तसेच अवकाश विज्ञान प्रयोगशाळेतील आकर्षक रंगसंगती व विविध उपकरणे, शक्तीशाली दुर्बिणी याविषयांची पहाणी केली तसेच गोविंदराव जिजाबा पवार बहुउद्देशीय सभागृहासही साहेबांनी भेट दिली.याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या आदरणीय मीनाताई जगधने, उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी मा कन्हेरकर साहेब , मुख्याध्यापिका श्रीमती सोनाली पैठणे व सर्व शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते.








